प्रेस नोट दिनांक - १८/०५/२०१९

---

**पर्वती पायथा येथील जुगार अडडयावर छापा सत्तावन्न हजाराचा माल जप्त, आठजण जेरबंद**

---

दिनांक – १७/०६/२०१९ रोजी गुन्हे शाखा युनिट ३ पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंन्द्र मोकाशी यांना खात्रीशीर माहीती मिळाली की पर्वती पायथा, पर्वती गावात बँक ऑफ महाराष्ट्र समोर, समर्थ वडेवाले या दुकानाचे बाजूस श्रीनाथ अमृततुल्य शेजारील दुकानात मटका, पणती, पाकोळी सोरट, इलेक्ट्रॉनिक्स गेम्स तसेच पत्त्याचा क्लब सारखा जुगार अड्डा चालू आहे. अशी माहीती मिळाल्यावरुन पोलीसांनी सदर ठिकाणी छापा टाकुन सदर व्यवसाय चालविणारा धंदयाचा मालक अनं - १) विजय एकनाथ ऊंडाळे वय - ५४ वर्षे रा - १७० पर्वती गाव पुणे तसेच सदर ठिकाणी चालु असलेला पंती पाकोळी नावाचा सोरटचा जुगार व कल्याण मटका नावाचे जुगाराचे आकडे घेणारे व खेळण्यासाठी हजर असलेले इसमनामे अनं - २) राजकुमार चन्नापा कुभार वय ३० वर्षे रा - गल्ली नं. ४ जनता वसाहत पर्वती पायथा पुणे ३) राजेंद्र रामभाऊ आगलावे वय ३९ वर्षे रा - तळजाईमाता वसाहत चव्हाणनगर पदमावती पुणे ३) लक्ष्मण श्रीपती येनपुरे वय ५४ वर्षे रा - किष्कींदानगर स.नं.१२० गणेश मंदिराजवळ कोथरुड पुणे. ५) प्रकाश बाबू मोकाशी वय - ४० वर्षे रा - गल्ली नं. २३ जनता वसाहत पर्वती पुणे ६) आप्पा भगवान खंडाळे वय - ३९ वर्षे रा - गल्ली नं. ३८/४ पर्वती दर्शन पुणे. ७) दुर्गेश प्रभाकर काळे वय - ३१ वर्षे रा - सिध्दी विनायक कॉम्पलेक्स बी विंग, फ्लॅट नं. ७ न-हे आंबेगाव पुणे. ८) मनोज बबन दिवसे वय - ३५ वर्षे रा - मु.पो. - सासवड ता. - पुरंधर जि. - पुणे यांना पकडण्यात आलेले आहे. सर्वजण सदर ठिकाणी पैशावर कल्याण मटका नावाचा जुगाराचे आकडे तसेच पंती पाकोळी नावाचा सोरटचा जुगार खेळताना मिळुन आले आहेत. **त्यांचे ताब्यातुन रोख रक्कम ४७,०६०/- रुपये तसेच एक मोबाईल फोन व मटका जुगार व पंती पाकोळी जुगाराची साधन सामग्रीसह एकूण किंमत रुपये ५७,१६०/- चा माल हस्तगत करण्यात आलेला आहे** व जुगाराचा अडडा उध्वस्त करण्यात आलेला आहे. वरील आरोपीं विरुध्द पोहवा/राहुल सखाराम घाडगे यांनी फिर्याद दिली आहे. सदरबाबत स्वारगेट पोलीस स्टेशन पुणे गु र नं – ३०३/२०१९ महाराष्ट्र जुगार ॲक्ट कलम १२ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे व आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.

सदरची कामगिरी गुन्हे शाखा, पुणे शहरचे अपर पोलीस आयुक्त श्री. अशोक मोराळे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे शहर श्री. शिरीष सरदेशपांडे, सहायक पोलीस आयुक्त गुन्हे - १ पुणे श्री. समीर शेख यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट - ३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र मोकाशी, पोलीस उप निरी श्री. संजय गायकवाड, किरण अडागळे व पथकातील पोलीस कर्मचारी राहुल घाडगे, मच्छिंद्र वाळके, गजानन गानबोटे, दत्तात्रय गरुड, सुजित पवार, सज्जाद शेख, पंढरीनाथ शिंदे, यांनी केली आहे.